राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना "रस्ता अनुदान" मंजूर करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ९० /नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ जानेवारी, २०१६

वाचा :-(१) नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य , शासन निर्णय क्रमांक आरडीएस-३६७८/१०८२-युडी-१०, दिनांक ५ जून, १९७८.

(२) नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य , शासन शुद्धीपत्रक क्रमांक आरडीएस-३६७८/१०८२-युडी-१०, दिनांक २५ जुलै, १९७८.

(३) नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य , शासन शुद्धीपत्रक क्रमांक आरडीएस-३६७८/१०८२-युडी-१०, दिनांक ९ ऑगस्ट, १९७८.

(४) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आरडीएस-१०९९/सीआर-१०७/९९/नवि-१६ दिनांक १८ डिसेंबर,१९९९

प्रस्तावना :-

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या हद्दीतील रस्त्यांची देखरेख-दुरूस्ती,रस्ता बांधणी, रस्त्यांचे डांबरीकरण, मोठ्या प्रमाणात नादुरूस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करण्यासाठी "सर्वसाधारण रस्ता अनुदान " व "विशेष रस्ता अनुदान " अशा दोन प्रकारे "रस्ता अनुदान" देण्यात येते. महापालिका वित्त आयोग व मोटार वाहन कर आकारणी चौकशी समिती यांच्या शिफारशी विचारात घेवून राज्यात दरवर्षी संकलित करण्यात येणा-या मोटार वाहन कराच्या दहा टक्के रक्कम "रस्ता अनुदान" म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर करण्यात येते. याबाबतचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१), (२), (३) व (४)

येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. तथापि,सदरचे निकष फारच जुने असून, परिस्थितीशी जुळत नसल्याने त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत वित्त विभागाने सूचित केलेले होते.सबब,राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना "रस्ता अनुदान" मंजूर करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मागील आर्थिक वर्षात संकलित होणा-या मोटार वाहन कराच्या दहा टक्के रक्कम राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत) यांना "सर्वसाधारण रस्ता अनुदान " व "विशेष रस्ता अनुदान " अशा दोन प्रकारे "रस्ता अनुदान " म्हणून मंजूर करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. **"सर्वसाधारण रस्ता अनुदान " मंजूर करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे -**

(अ) पात्रतेचे निकष :-

राज्यातील अस्तित्वातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत ह्या "सर्वसाधारण रस्ता अनुदान " मिळण्यास पात्र राहतील.

(ब) निधी मंजूरीची मर्यादा :-

"सर्वसाधारण रस्ता अनुदान " खालील मर्यादेत दरवर्षी मंजूर करण्यात येईल

अ.क्र.	लोकसंख्येनुसार वर्गीकरण	रक्कम रू. (लक्ष)
१	"अ+" वर्ग महानगरपालिका	१७५
२	"अ" वर्ग महानगरपालिका	१५०
३	"ब" वर्ग महानगरपालिका	१२५
४	"क" वर्ग महानगरपालिका	१००
५	"ड" वर्ग महानगरपालिका	७५
६	"अ" वर्ग नगरपरिषद/नगरपालिका	६५
७	"ब" वर्ग नगरपरिषद/नगरपालिका	५०
८	"क" वर्ग नगरपरिषद/नगरपालिका	३५
९	नगरपंचायत	२०

(क) कार्यान्वयन यंत्रणा: -

"सर्वसाधारण रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घेण्यात येणा-या कामांच्या अंमलबजावणीकरिता कार्यान्वयन यंत्रणा संबधित महानगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत राहील.

(ड) कामे निश्चित करणे: -

मंजूर करण्यात येणा-या "सर्वसाधारण रस्ता अनुदान " च्या मर्यादेत संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची सर्वसाधारण सभा कामे निश्चित करेल.

(इ) कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करणे: -

सर्वसाधारण सभेत निश्चित करण्यात आलेल्या कामांना संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आयुक्त/मुख्याधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/ सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त करून घ्यावी.

(ई) कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे: -

"सर्वसाधारण रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घेण्यात येणा-या कामांना सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे आयुक्त/मुख्याधिकारी सक्षम राहतील.

३. "विशेष रस्ता अनुदान " मंजूर करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे -

(अ) पात्रतेचे निकष :-

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नियमित मिळणा-या "सर्वसाधारण रस्ता अनुदान " व्यतिरिक्त "विशेष रस्ता अनुदान " मिळण्यास अस्तित्वातील सर्व महानगरपालिका /नगरपरिषद/नगरपंचायत पात्र राहतील.तथापि, "सर्वसाधारण रस्ता अनुदान " मंजूर करून शिल्लक अर्थसंकल्पीय तरतूद व मागणीचे प्रस्ताव विचारात घेवून आवश्यकतेनुसार महानगरपालिका /नगरपरिषद/नगरपंचायत यांना "विशेष रस्ता अनुदान " मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदरचे अनुदान मंजूर करतेवेळी खालील बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल-

(१) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वित्तीय परिस्थिती
(२) स्थानिक गरज व प्राथमिकता
(३) पूरक विकास प्रकल्पाकरिता
(४) भौगोलिक परिस्थिती
(५) नैसर्गिक आपत्ती
(६) नागरीकरणाचा दर
(७) पूरक दळणवळण साधनांचा विकास
(८) हागणदारीमुक्त व स्वच्छ शहराची निर्मिती.इत्यादी

(ब) निधी मंजूरीची मर्यादा :-

उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद , पात्रतेचे निकष, मागणीचे प्रस्ताव, कामांचे स्वरूप इत्यादी बाबी विचारात घेवून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय निधी मंजूरीची मर्यादा निश्चित करण्यात येईल.

(क) कार्यान्वयन यंत्रणा: -

"विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घेण्यात येणा-या कामांच्या अंमलबजावणीकरिता कार्यान्वयन यंत्रणा आवश्यकतेनुसार शासनस्तरावरून निश्चित करण्यात येईल. ज्याप्रकरणी शासनस्तरावरुन कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात येणार नाहीत अशा प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा संबधित महानगरपालिका/ नगरपरिषद /नगरपंचायत राहील.

(ड) कामे निश्चित करणे: -

मागणीचे प्रस्ताव व कामांचे स्वरूप विचारात घेवून "विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घ्यावयाची कामे शासनस्तरावरून निश्चित करण्यात येतील. ज्याप्रकरणी शासनस्तरावरून कामे निश्चित करण्यात येणार नाहीत अशा प्रकरणी सर्वसाधारण सभा कामे निश्चित करतील.

(इ) कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करणे: -

"विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत मंजूर निधीच्या मर्यादेत संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आयुक्त/मुख्याधिकारी यांनी कामांना सार्वजनिक

बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/ सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता प्राप्त करून घ्यावी.

(ई) कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे: -

(i) "विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबधित आयुक्त/मुख्याधिकारी यांनी पुढीलप्रमाणे गठीत केलेल्या समितीसमोर प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.

महानगरपालिका अंतर्गतच्या कामांकरिता समिती -

(१) विभागीय आयुक्त	- अध्यक्ष
(२) संबधित जिल्हाधिकारी	- सदस्य
(३) कार्यान्वयन यंत्रणेचा सक्षम अधिकारी	- सदस्य
(४) संबधित महानगरपालिकेचे आयुक्त	- सदस्य सचिव

नगरपरिषद/नगरपंचायत अंतर्गतच्या कामांकरिता समिती -

(१) जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
(२) कार्यान्वयन यंत्रणेचा सक्षम अधिकारी	- सदस्य
(३) संबधित नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी	- सदस्य सचिव

(iii) "विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत हाती घेण्यात येणा-या कामांकरिता आवश्यक असणा-या ना-हरकता परवानग्या देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही संबधित आयुक्त/मुख्याधिकारी यांनी करावी.

४. "रस्ता अनुदान " अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात -

(अ) सदरची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात येवू नये .

(ब) सदरची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदरची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे तसेच, कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक करणे.

(ड) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील रस्त्यांची देखरेख-दुरूस्ती, डांबरीकरण, मोठ्या प्रमाणात नादुरूस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकासाची कामे "रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घेण्यात यावीत. रस्ता विकासाव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्रकारची कामे हाती घेण्यात येवू नयेत.

(इ) सदर कामांसाठी "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. "ई-निविदा" अंतीचा खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५. "रस्ता अनुदान" खाली दरवर्षी मंजूर करण्यात येणा-या निधीच्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

६. "विशेष रस्ता अनुदान " अंतर्गत मंजूर करण्यात येणारा निधी ठेव बांधकामाचे स्वरूपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करू नये.

७. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, ३०५४, मार्ग व पूल, ०४, जिल्हा व इतर मार्ग, ८००, इतर खर्च, (०२) (०१) रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी नगरपरिषदांना/महानगरपालिकांना सर्वसाधारण मार्ग अनुदान, ३१ , सहायक अनुदाने (वेतनेतर) (३०५४ ००२२) या लेखाशीर्षाखालील दरवर्षी मंजूर करण्यात येणा-या तरतुदीमधून भागविण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१६०४०४४३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar
Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: CN = Vivek Shankar Kumbhar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = UNDER SECRETARY
Date: 2016.01.16 17:24:51 +05'30'

(विवेक कुंभार)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त मंत्रालय,मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१५. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी
१९. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
२०. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.